**FOR OFFICIAL USE**

**Tender**


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

**Tel. : (0253) – 2230024(Purchase), 2230111(Services Section),**

**Fax : (0253) – 2230470**

Email : **chaure_mk@ycmou.digitaluniversity.ac**

[Visit us on Internet at www.ycmou.ac.in & http://ycmou.digitaluniversity.ac]


# निविदा संच
# यश इन इमारतीत उपाहारगृह चालविणे

**Tender Notice No. PUR/2022-23/110**
**Dated: 27.01.2023**

**कुलसचिव,**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- 422222**

**दूरध्वनी(0253) – 2230024 (Purchase), 2230111 (Services Section), Fax: (0253) 2230470,**

**Web Site - http://ycmou.digitaluniversity.ac & www.ycmou.ac.in**

**Tender No. : PUR/2022-23/110**

## निविदा वेळापत्रक

| | |
|---|---|
| **निविदेचे नाव** | **यश इन इमारतीत उपाहारगृह चालविणे** |
| **निविदेची किंमत** | **रु.** 3540/-(With GST18%) **ना परतावा**<br>"Finance Officer, YCMOU, Nashik" यांचे नावे देय असलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) तांत्रिक निविदेत सादर करावा. |
| **निविदा इसारा रक्कम** | **रु.** 50000/- (**पन्नास हजार फक्त**)<br>"Finance Officer, YCMOU, Nashik" यांचे नावे देय असलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) तांत्रिक निविदेत सादर करावा. |
| **निविदा स्विकारण्याची मुदत** | **दि.** 27.01.2023 **ते** 13.02.2023 **सकाळी** 10.30 **ते सायंकाळी** 5.00 पर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञान गंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक येथे मा. कुलसचिव यांचे कार्यालयात निविदा पेटीत टाकाव्यात. |
| **तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख** | **दि.** 14.02.2023 **रोजी दुपारी** 12.00 **वाजता** |
| **व्यावसायिक निविदा** | सोबत दिलेल्या प्रक्रियेनुसार तांत्रिक निविदेत पात्र झाल्यानंतर पात्र निविदाधारकांच्याच व्यावसायिक निविदा उघडण्यात येतील. |

**टिप:**

1. **इच्छुकांनी सदर निविदा विद्यापीठाच्या** http://ycmou.digitaluniversity.ac & www.ycmou.ac.in **या वेबसाईटवरून डाऊनलोड करुन निविदा भरावी.**
2. सर्व अटी, शर्ती व सूचना निविदेत बघाव्यात. कोणतीही एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**कुलसचिव**
**य.च.म.मुक्त विद्यापीठ**

**विद्यापीठाच्या यश इन इमारतीमध्ये उपाहारगृह चालविण्याकरिता निविदा सूचना-**

कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील यश इन इमारतीमध्ये उपाहारगृह चालविण्याकरिता निविदा मागवित आहेत. सदर निविदा विद्यापीठाच्या - http://ycmou.digitaluniversity.ac & www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे गंगापूर धरणाजवळ महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले आहे. या विद्यापीठात साधारणतः एकूण 400 व्यक्ती कार्यरत आहेत. याशिवाय विद्यापीठात दररोज अनेक विद्यार्थी परीक्षेच्या व इतर कामासाठी येत असतात. विद्यापीठातर्फे समित्या व कामकाजाकरिता बैठका तसेच सभा घेतल्या जातात. त्यासाठी इतर विभागातून अनेक मान्यवर येत असतात, तसेच या परिसरात बाहेरच्या कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते.

विद्यापीठाच्या परिसरात उत्कृष्टरित्या बांधलेली यश इन नावाची इमारत आहे. त्याठिकाणी आधुनिक पध्दतीचा भोजन कक्ष तसेच बायोगॅस सुविधा उपलब्ध् आहे. या कक्षामध्ये 18 मोठे टेबल, 66 खूर्च्या , पडदे, एयर कंडीशनर, लाईट, पंखे इ. सोयीने परिपूर्ण व्यवस्था आहे. या कक्षाचे क्षेत्रफळ साधारणतः अंदाजे 6000 स्क्वेअर फूटपेक्षा अधिक आहे. तसेच स्वतंत्र मोठे स्वयंपाकघर व साहित्य ठेवण्याकरिता पुरेशा खोल्या आहेत. सदर कक्ष उपहार गृहासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. याठिकाणी 24 तास पाण्याची व विद्युत व्यवस्था उपलब्ध आहे.

**विद्यापीठामार्फत उपाहार गृह, स्वयंपाक घर, फर्निचर, पाणी, लाईट इ. सुविधा निशूल्क दिल्या जातील. या सुविधांच्या रकमेचा विचार करुन कंत्राटदाराने खाद्यपदार्थांचे Subsidies दर भरणे आवश्यक आहे.**

सदर उपाहारगृह एक वर्षाकरिता चालविण्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर उपाहारगृह उत्कृष्टरित्या चालविल्यास म्हणजेच त्याचे काम समाधानकारक वाटल्यास दरवर्षी एक अशा पुढील दोन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येऊ शकते. या कंत्राट कालावधीत किंवा त्यानंतरच्या मुदत वाढीत खाद्य पदार्थांच्या ठरलेल्या दरात व अटींमध्ये कोणतेही बदल होणार नाही. जर असे बदल करावयाचे असतील तर स्वतंत्र निविदा काढण्यात येईल.

**सदर निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. यामध्ये पहिला लिफाफा हा तांत्रिक निविदेचा असेल व दुसरा लिफाफा हा व्यावसायिक निविदेचा असेल.**

**लिफाफा -१ वर तांत्रिक निविदा व लिफाफा -२ वर व्यावसायिक निविदा असा स्प्ष्ट उल्लेख करुन हे दोन्ही लिफाफे सिलबंद करुन एका मोठ्या पाकीटात टाकून ते सिलबंद करावे. मोठ्या पाकिटावर मोठ्या अक्षरात "निविदेचे नाव व निविदा क्रमांक" लिहावे. सदर पाकिट दिलेल्या मुदतीत कुलसचिव कार्यालयातील निविदा पेटीत टाकावे.**

**अ) तांत्रिक निविदाः**

तांत्रिक निविदेमध्ये (लिफाफा-1) निविदा शूल्क रु.3540/-(With GST18%) आणि अनामत रक्कम (EMD) रु.50,000/- रकमेचे दोन वेगवेगळे डिमांड ड्राफ्ट असणे आवश्यक आहे.

१. निविदाधारकाची हॉटेल, रेस्टॉरंट, उपाहारगृह चालविण्यासाठी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना / M.S.M.E. /उद्योग आधार ...इ.मध्ये नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे. संबंधित प्रमाणपत्र सोबत जोडावे.

२. निविदाधारकाजवळ हॉटेल, रेस्टॉरंट, उपाहारगृह, भोजनालय ज्यात भोजन व स्नॅक्स तयार करुन पुरविल्या जातात अशा उपक्रमाचा कमीतकमी पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. याकरिता मागील तीन वर्षांचे अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

३. निविदाधारकाच्या उपहारगृहाची मागील तीन वर्षांची (2021-22, 2020-21, 2019-20,) वार्षिक सरासरी उलाढाल रु.35 लाख असणे आवश्यक आहे. याकरिता मागील तीन वर्षाच्या Audited Statements किंवा चार्टड अकाऊंटंट यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडावे.

४. निविदा सादर करतांना रु.3540/-(With GST18%) निविदा किंमतीचा (ना परतावा) व अनामत रक्कम (EMD) रु.50,000/- चा बँक धनाकर्ष (डीडी) सोबत जोडावे. सदर डीडी 'Finance Officer,YCMOU, Nashik' या नावाने काढलेले असावेत. अपात्र निविदाधारकांची अनामत रक्कम परत करण्यात येईल व पात्र निविदाधारकाची अनामत रक्कम सुरक्षा ठेव रकमेत वर्ग करण्यात येईल.

५. निविदाधारकाजवळ Food Safety & Standards Act 2006 अनुसार उपाहार गृह चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. सदर परवान्याची स्वप्रमाणित फोटो प्रत जोडावी.

६. निविदाधारकांने पॅन कार्ड ची प्रत सोबत जोडावी.

७. निविदाधारकांने जीएसटी नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.

८. जीएसटी चलन भरले असल्यास त्याची प्रत सोबत जोडावी.

९. प्रपत्र **१ व 3** मधील माहिती भरुन तांत्रिक निविदा लिफाफा १ मध्ये जोडावी

वरील १ ते ९ कागदपत्रे तांत्रिक निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

**आ) व्यावसायिक निविदा-**

प्रपत्र २ मध्ये दिलेल्या तक्त्यामध्ये पदार्थांच्या बाजारभावानुसार दर दिलेले आहेत. निविदाधारकांने सदर दरांवर द्यावयाची सूट एकत्रितरित्या टक्केवारीमध्ये व्यावसायिक निविदेच्या तक्त्यामध्ये भरून स्वाक्षरीसह सिलबंद लिफाफ्यात व्यावसायिक निविदा असे नमूद करुन सादर करावेत.

**वरील आवश्यक अटींव्यतिरिक्त खालील अटीची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.**

१) विद्यापीठामार्फत डायनिंग हॉल, स्वयंपाक घर , पाणी, लाईट इ. सुविधा निशूल्क दिल्या जातील. सदर सुविधांचे भाडे साधारणतः रु.1,50,000/- प्रती महिना असे गृहित धरुन खाद्यपदार्थांचे दर भरावे. मात्र सदर भाडे कंत्राटदारास निशुल्क राहील.

२) "प्रपत्र 2" मधील अन्नपदार्थाच्या बाजारभावानुसार असलेल्या दरांवर द्यावयाची सुट एकत्रितरित्या टक्केवारीमध्ये सादर करावी. अधिकतम सूट असलेले दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल. सादर केलेले दर हे वाहतूक, वस्तू व सेवाकर (GST) इ. सह असावेत. विद्यापीठामार्फत कोणतेही अतिरिक्त कर देय असणार नाहीत, याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

३) न्यूनतम दरांची निविदा स्विकारणे विद्यापीठावर बंधनकारक राहणार नाही. तसेच एक अथवा सर्वच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

४) ज्या निविदाधारकांना निविदा दाखल करण्याअगोदर विद्यापीठ मुख्यालयातील उपहारगृहाची जागा पहावयाची असल्यास त्यांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

५) उपहारगृह चालविण्यासाठीचे दरपत्रक एक वर्षासाठी वैध असेल. कंत्राटदाराचे कामकाज समाधानकारक आढळून आल्यास पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल. या दरांमध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करता येणार नाही.

६) उपाहारगृहात सकाळी 7 ते रात्री 9 पर्यंत खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे लागतील. तसेच आलेल्या अभ्यागतांसाठी वेळेनुसार व आवश्यकतेनुसार न्याहारी व भोजनाची व्यवस्था करावी लागेल.

७) खाद्य पदार्थाच्या मान्य केलेल्या दरांचे दरपत्रक प्रत्येक टेबलवर ठेवणे व भिंतीवर लावणे बंधनकारक राहील, तसेच उपाहारगृहात तक्रारपेटी ठेवणे आवश्यक राहील.

८) कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता निवास व्यवस्था दिली जाईल, त्याचे वेगळे शुल्क आकारले जाईल.

९) कंत्राटदाराने उपहारगृहामध्ये कार्य करत असलेल्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ गणवेश देणे आवश्यक आहे. तसेच उपाहारगृहात सेवा देण्यास पुरेसे कर्मचारी उपलब्ध असावेत.

१०) कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये कार्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांबाबत शासकीय नियम व कायदे पाळणे बंधनकारक राहील.

११) उपहारगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन व सुरक्षेची सर्व जबाबदारी कामगार कायद्याच्या अद्ययावत तरतूदीनुसार कंत्राटदारांची राहील.

१२) उपहारगृहांमध्ये कार्य करित असलेले कर्मचारी आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहेत याबाबत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचा पत्ता, फोटो व आधारकार्ड् विद्यापीठाच्या कार्यालयात सादर करावे लागेल. या कर्मचाऱ्यांवर कुठलीही पोलिस केस नसल्याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

१३) कंत्राटदाराने उपहारगृहामधील फर्निचर तसेच विविध उपकरणांची निगा राखणे आवश्यक आहे. तसेच भोजनकक्ष व स्वयंपाकघर स्वच्छ असणे आवश्यक आहे.

१४)उपाहारगृहात उंदराचा व इतर प्राण्यांचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना **(Paste Control** ) करणे आवश्यक राहील. तसेच माश्या व किड्यांपासून बचाव करण्याकरिता दोन माश्या प्रतिबंध उपकरणे लावणे आवश्यक आहे.

१५)कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये रेफ्रिजरेटरची व्यवस्था करावी लागेल. तसेच करार कालावधीत इलेक्ट्रिक उपकरणांची आणि अन्य वस्तूंची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करावी लागेल.

१६) उपाहारगृहात दररोज तयार होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट विद्यापीठाने नेमून दिलेल्या ठिकाणीच करावी लागेल. कचऱ्याची योग्यरित्या विल्हेवाट न लावल्यास रु ५००/- प्रतिदिन दंड आकारला जाईल.

१७)नियमित कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त विद्यापीठात घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांना तसेच सभा संमेलनाला येणाऱ्या अभ्यांगतांसाठी विद्यापीठाच्या आवश्यकतेप्रमाणे न्याहारी व भोजनाची व्यवस्था करावी लागेल. 100 पेक्षा जास्त व्यक्तींचे जेवण एकावेळी द्यावयाचे असल्यास बुफे प्रकारात जेवण देण्याची मुभा राहील.

१८)स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे साधनसामग्री भेसळयुक्त नसावी. स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे खाद्यतेल व वनस्पती तुप / शुध्दतुप, मसाले व इतर खादयसामग्री "अँगमार्क" प्रमाणित असावी. तसेच खाद्यपदार्थ तयार करतांना सुर्यफूल डबल फिल्टर रिफाइंड तेल वापरावे. भोजन, नास्ता या मध्ये पुरविण्यात येणारे सर्व खाद्यपदार्थ उच्च दर्जाचे व खाण्यास योग्य असतील असे बनविण्यात यावेत. तसेच चपाती तयार करणेकरीता गव्हू व भातासाठीचा तांदुळ हा उच्च प्रतीचा असावा.

१९) स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे खाद्यपदार्थ किंवा ते बनविण्यासाठी लागणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे आढळून आल्यास कर्मचारी किंवा अभ्यांगतांना बाधा झाली असे सिध्द झाल्यास विद्यापीठ प्रशासनाकडून कंत्राटदाराची सेवा स्थगित करण्यात येईल.

२०) विद्यापीठातील विविध बैठका व इतर उपक्रमाची देयके विद्यापीठामार्फत अदा केले जातील. सदर देयके संगणकावर त्याच दिवशी काढलेली असावीत. मात्र त्यासाठी वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटरची किंवा बिलींग मशीनची व्यवस्था कंत्राटदाराने स्व्तः करणे आवश्यक राहील.

२१) विद्यापीठाने ठरवून दिलेल्या जागी विद्यापीठ कर्मचारी व अभ्यांगतांना खाद्य पदार्थ पुरवावे लागतील. तसेच अल्पोपहारासाठी ठरवून दिलेल्या जागेचा वापर करावा लागेल.

२२) स्वयंपाक घरात आगीसारख्या दुर्घटनेपासून बचाव करण्याकरिता विशेष दक्षता घेणे आवश्यक राहील. कंत्राटदाराने गॅस सिलेंडरची अयोग्यरितीने साठवणूक केल्यास रु. 500/- दंड आकारला जाईल. स्वयंपाक करताना अपघात झाल्यास कंत्राटदार स्वतः जबाबदार असेल, त्याबाबत विद्यापीठाकडुन नुकसान भरपाई मिळणार नाही. संस्थेच्या आवारात अशा अपघातामुळे संस्थेला नुकसान झाल्यास अथवा कर्मचाऱ्यास / अभ्यांगतास दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

२३) उपाहारगृहात कोणत्याच प्रकारची अमली पदार्थ साठवणूक तसेच त्यांची विक्री करता येणार नाही.

२४) उपहारगृहात कोणत्याही प्रकारच्या जाहिराती तसेच आक्षेपार्ह फलक अथवा जाहीराती लावता येणार नाही.

२५) कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम विद्यापीठामार्फत दिली जाणार नाही. तसेच विद्यापीठामार्फत दिले जाणारे देयक आर.टी.जी.एस द्वारे अदा करण्यात येईल.

२६) सदर कराराच्या अनुषंगाने कायदेविषयक बाबी नाशिक येथील न्यायालयाच्या अखत्यारित येतील.

२७) कंत्राट प्राप्त् झाल्यास कार्यादेश दिल्यानंतर सात दिवसांचे आत उपाहार गृहाकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी सेवा सुविधा कक्षाकडे सादर केल्यानंतरच उपाहार गृह चालविण्याकरिता ताबा देण्यात येईल. सदर मुदतीत वरील कार्यवाही न केल्यास कार्यादेश रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाचे राहतील.

२८) विद्यापीठाची उपाहारगृह व्यवस्था समिती उपाहारगृहास वेळोवेळी भेट देईल. त्यावेळी उपाहारगृहात देण्यात येणारा नाश्ता, चहा व भोजन यामध्ये समितीने सुचविलेले बदल वेळोवेळी करण्यात यावे.

२९) विद्यापीठ प्रशासनास/ उपाहारगृह व्यवस्था समितीस केव्हाही उपाहारगृहाचे, खाद्यपदार्थांचे तसेच खाद्य सामग्रीचे निरीक्षण/तपासणी, उपाहारगृहाची स्वच्छता इ.च्या दर्जाबाबत केव्हाही भेट देवून तपासणी करण्याचे अधिकार असतील अशाप्रकारच्या तपासणीत कराराच्या कुठल्याही

अटींचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास करार रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील.

३०) उपकंत्राट करण्याची परवानगी नाही. निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या सर्व प्रकारच्या सेवांसाठी निविदाधारक जबाबदार असेल आणि कंत्राटदाराला कोणत्याही किंवा सर्व सेवांचे उपकंत्राट करण्याची परवानगी नाही, तसे आढळल्यास, विद्यापीठाकडून करार तात्काळ संपुष्टात करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

**इ) सुरक्षा ठेव-**

कंत्राट प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदाराने रु.1,50,000/- सुरक्षा ठेव रक्कम विद्यापीठात जमा करावयाची आहे. कंत्राटदाराची अनामत रक्कम रु.50,000/- सुरक्षा ठेव रकमेत वर्ग करण्यात येईल. व उर्वरित रक्कम रु.1,00,000/- कंत्राटदाराने आरटीजीएस द्वारे विद्यापीठाच्या खात्यात वर्ग करावी. सदर रकमेवर विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे सदरची रक्कम करार संपल्यानंतर अदा केली जाईल. सदर रक्कम अदा करतांना त्यातून येणे रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

**प्रपत्र -1**

**सदरची माहिती तांत्रिक निविदेसोबत जोडावी.**

**उपाहारगृहाचे नाव :-** ----------------------------------------------------------------

**उपाहारगृह सुरु केल्याची तारीख :-** -----------------------------------------------------

**उपाहारगृह मालकाचे नाव व पत्ता :-**-----------------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------
--------------------------------------------

**दूरध्वनी व मोबाईल क्रमांक :-** -----------------------------------------------------
-------------------------------------------------

**ई मेल आयडी :-** ------------------------------------------------------------------

**पॅन क्रमांक :-** ------------------------------------

**G.S.T. क्रमांक:-** -------------------------------

**अनुभव :- 1. एकूण वर्ष :**-------------------------------------------

**2. एकूण संस्था:-** ----------------------------------------
(उपाहारगृह सेवा पुरविल्याच्या संस्था)

**नाव, सही, शिक्का**

प्रपत्र -2

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## यश इन इमारत उपहारगृह, व्यावसायिक निविदा

**निविदाधारकाने खालील तक्त्यात दर भरावे. (निविदा मान्य झाल्यास या दरात बदल करता येणार नाही) ही निविदा वेगळ्या पाकिटात सिलबंद करुन त्यावर लिफाफा 2 व्यावसायिक निविदा असा उल्लेख करावा.**

| क्र. | खाद्यपदार्थाचे नांव व विवरण | संख्या | दर (रु.) (बाजारभावाप्रमाणे) | सूट टक्केवारीत (%) |
|---|---|---|---|---|
| **अ** | **न्याहरी** ( Snacks) | | | |
| १ | उपमा/शिरा/ पोहे 100 ग्रॅम | प्रतीप्लेट | **25.00** | |
| २ | कांदाभजी /बटाटाभजी / मूगभजी 100 ग्रॅम | प्रतीप्लेट | **25.00** | |
| ३ | बटाटेवडा /समोसा/सॅण्डवीच/चटणी | प्रतीप्लेट 1 नग | **15.00** | |
| ४ | मिसळ व २ पाव | प्रतीप्लेट | **50.00** | |
| ५ | इडली-4 नग /वडा-2नग, सांभार व चटणी | प्रतीप्लेट | **30.00** | |
| ६ | व्हेज बर्गर/व्हेज ग्रील स्टंड | प्रतीप्लेट | **30.00** | |
| ७ | साबुदाणा खिचडी 100 ग्रॅम /साबुदाणावडे-२ नग | प्रतीप्लेट | **25.00** | |
| **आ** | **पेय** | | | |
| १ | चहा - १०० मिली | प्रतीकप | **10.00** | |
| २ | कॉफी-१०० मिली | प्रतीकप | **15.00** | |
| ३ | दुध-२०० मिलि | प्रतीग्लास | **20.00** | |
| ४ | लस्सी- २०० मिली | प्रतीग्लास | **25.00** | |
| **इ** | **अल्पभोजन (राईस प्लेट)** | | **15.00** | |
| - | २०सेमी पोळ्या- ३, सुकी भाजी-१, पातळ भाजी-१, भात- १ वाटी, वरण, पापड, लिंबू, कोशिंबीर/सलाड/ लोणचे, कांदा. | प्रतीभोजन | **90.00** | |
| **ई** | **पूर्णभोजन (अमर्यादित जेवण)** | | | |
| - | पोळी/पुरी, सुकी भाजी, पातळ भाजी, भात, वरण, पापड, दही/ कढी/ रायता, लिंबू, कोशिंबीर/सलाड/ लोणचे, कांदा | प्रतीभोजन | **110.00** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | गोड पदार्थ (अतिरिक्त)-१ (जिलेबी, शिरा, गुलाबजाम, श्रीखंड, रसमलई इ.) | | **30.00** | |
| उ | **अत्यल्पभोजन -** | | | |
| - | २०सेमी पोळी ३, भात- १ वाटी, पातळ भाजी-१, लिंबू, चटणी/ कांदा | प्रतीभोजन | **60.00** | |
| ऊ | **मांसाहारी -(दररोज ऑर्डरनुसार) न्याहरी ( Snacks) व भोजन** | | | |
| १ | उकडलेले अंडे | 2 नग | **10.00** | |
| २ | एक अंडाहाफ/फुल फ्राय ऑमलेट + ब्रेड 2 स्लाईज | प्रतीप्लेट | **20.00** | |
| ३ | अंडा भुर्जी (दोन अंडे) व 2 पाव | प्रतीप्लेट | **40.00** | |
| ५ | पाव | प्रतीनग | **5.00** | |
| ६ | **<u>अल्पभोजन-</u>**अंडाकरी (2अंडे)- २० सेमी पोळ्या- 4, भात- १ वाटी, पापड, लिंबू, कोशिंबीर/सलाड/लोणचे, कांदा. | प्रतीप्लेट | **100.00** | |
| ७ | **<u>अल्पभोजन</u>**- चिकनकरी-(4 Pices)- २० सेमी पोळ्या- 4, भात- १ वाटी, पापड, लिंबू, कोशिंबीर/सलाड/लोणचे, कांदा. | प्रतीप्लेट | **130.00** | |
| ८ | **<u>पूर्ण भोजन (अमर्यादित जेवण):</u>**पोळी/भाकरी, चिकन करी ( 8 Pices ), भात १ वाटी, पापड, दही/ रायता, लिंबू, कोशिंबीर/सलाड/ लोणचे, कांदा, | प्रतीप्लेट | **175.00** | |

निविदाधारकाची सही व शिक्का

# प्रपत्र -3

# प्रमाणपत्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन नाशिक यांच्या निविदेतील सर्व् अटी व शर्ती मला मान्य् आहेत. उपाहारगृह चालविण्यासाठी निविदेतील प्रपत्र- 2 मध्ये दर नमूद केलेले असून आमचे दर मंजूर झाल्यास उपाहारगृह चालविण्यास आम्ही त्या दरास बांधिल आहोत. आमची निविदा अंतीम झाल्यास प्रपत्र- 2 मध्ये नमूद केलेली रक्कम आम्हास मान्य राहील. विद्यापीठ नियमानुसार उपाहारगृह चालविण्यास आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

नाव ..............................................................................

पत्ता ..............................................................................

--------------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ..............................................................................

निविदाधारकाची सही ..............................................................................
शिक्का

**पाकिटावर खालील नमुन्यानुसार माहिती भरून ती संबंधीत पाकिटावर चिकटवावी**

**निविदेचे नाव: यश इन इमारतीत उपाहारगृह चालविणे**

**प्रति,**
**मा. कुलसचिव,**
**य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक**

**निविदाधारकाचे नाव, पत्ता:**

______________________________

______________________________